e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# दशरूपकातील संधी आणि पटकथा लेखन

**प्राजक्ता आनंद बुडईकर**[1]
संशोधक

**डॉ. जयश्री अ. सकळकळे**[2]
मार्गदर्शक

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.52

संस्कृत साहित्यात "नाट्यशास्त्र" हा नाटकासंबंधीचा सर्वाधिक विचाराचा एक कोश आहे. भरत मुनीविरचित नाट्यशास्त्रामध्ये ज्ञान, शिल्प, विद्या, कला, योग अशा अनेक विषयावर चर्चा केलेली दिसून येते. नाट्यशास्त्र या ग्रंथांमध्ये 36 अध्याय व 600 श्लोक संख्या आहे. हा ग्रंथ खूप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे धनंजय यांनी दशरुपक हा ग्रंथ निर्माण केला. या ग्रंथांमध्ये नाट्यशास्त्राप्रमाणेच नाट्य आणि नाट्य निर्मितीसाठी आवश्यक काही नियम व अटी सांगण्यात आलेल्या आहेत. या नाट्यग्रंथामध्ये चार प्रकाश सांगितलेले आहेत. प्रथम प्रकाशामध्ये मंगलाचरण, वस्तू,नेता, रस, अर्थप्रकृती, अवस्था, प्रवेशक, विष्कम्भक, आणि संधीचे वर्णन आलेले आहे. द्वितीय प्रकाशामध्ये नायकाचे लक्षणे व नायिकेचे लक्षणे सांगितले आहेत. तृतीय प्रकाशामध्ये नाटकाची वृत्ती वर्णीत केलेली आहे. चतुर्थ प्रकाशामध्ये रस, व्यभिचारी भाव या सागितलेल्या आहे. त्याचप्रमाणे नायकाचे गुण आणि नायिकेचे गुण सुद्धा सांगितलेले आहे. तसेच कथेच्या अनुरूप जे काही नियम असतील कथा कशा स्वरूपात असायला पाहिजे त्याची माहिती या ग्रंथामध्ये दिलेली आहे. जी माहिती आपल्याला पटकथा लिहत असताना आवश्यक आहे.

पटकथा याचा इंग्रजी अर्थ स्क्रिप्ट असा होतो. हा शब्द लॅटिन शब्द आहे जो स्क्रिबिरे यामधून बनला आहे. याचा अर्थ लिहिणे असा आहे. आणि त्याचे सर्व अर्थ लिहिलेल्या गोष्टींशी संबंधित आहे. पटकथा लेखक कथेचे संशोधन करणे कथा विकसित करणे पटकथा संवाद लिहिणे व आवश्यक स्वरूपात त्याच्या शेवटास नेने ही जबाबदारी असते एका तासाहून अधिक वेळ चालणाऱ्या व्यावसायिक कथानक चित्रपटात फीचर लांबीचे चित्रपट असे म्हणतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वात जुने कथानक चित्रपट मूलतः रंगमंचावर चित्रित केलेले होते. पहिल्या किंवा चार दशकांमध्ये व्यावसायिक निमित्ताने शतकानूशतके जुन्या नाट्य परंपरेवर जोर दिला जात असे. चित्रपटाच्या या शैलीमध्ये विश्वासार्ह कथा व पात्र प्रेक्षकांना ते पटवून देण्यास मदत करतात ही उलगडणारे काल्पनिक कथा वास्तविक आहे. या चित्रपटांमध्ये इतर घटकांसह कॅमेरा, प्रकाश योजना याची हालचाल अधिक महत्वाची आहे. स्क्रिप्ट ही नाटक आणि चित्रपटाची लिखित आवृत्ती असते तुम्ही एखाद्या चित्रपटासाठी

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

ऑडिशन देत असता, तेव्हा तुम्हाला एखादा सीन साठी एक विशिष्ट स्क्रिप्ट दिली जाते तिलाच पटकथा असे म्हणतात. नाट्यनिर्मितीसाठी किंवा नाट्य प्रदर्शित करण्यासाठी सुरुवातीला पटकथा लिहिणे गरजेचे आहे. पटकथा लिहित असताना नाट्याच्या अनुषंगाने त्यामध्ये आवश्यक असणाऱ्या ज्या काही कथा आहेत. त्या कथे मागचे जे काही प्रयोजन आहे त्या प्रयोजना ला दशरुपकामध्ये संधी असे म्हटलेले आहे. एका घटनेचा दुसऱ्या घटनेची येणारा जो काही संबंध असतो त्याला संधी असे म्हणतात. दशरुपकातील संधी पटकथेमध्ये कशा स्वरूपात दिसून येतात याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात येत आहे.

**दशरुपक या ग्रंथांमध्ये दहा रूपक सांगितली आहे.**

"नाटकं सप्रकरणं भान: प्रहसनं डिम:।

व्यायोगसमवकारौ विथ्यङ्केहामृगा इति,।।

नाटक, प्रकरण,भान, प्रहसन, डीम, व्यायोग, समवकार, विथी, अंक, ईहामृग हे रुपकाचे दहा प्रकार आहेत. यामध्ये प्रत्येक रूपकाचे नियम नायक नायिकेच्या संदर्भात वेगवेगळी दिलेली आहेत. तसेच पात्रांच्या संदर्भातही त्याची वेगवेगळी मांडणी केलेली आहे. नाटकांमध्ये संधी म्हणजे कथेच्या एक भाग त्याचं प्रयोजन आणि दुसरा भाग त्याचे प्रयोजन काय याचा जो मधला संबंध असतो त्याला संधी असे म्हणतात. कथेचा मुख्य प्रयोजन व ज्यामध्ये आलेले गौण प्रयोजन यातील गौण प्रयोजन सोडून देऊन, मुख्य प्रयोजनाला जेव्हा एखादा भाग जोडला जातो. त्याला संधी असे म्हणतात. नाट्यशास्त्रामध्ये प्रमुख पाच संधी आहेत. प्रत्येक संधीचे उपप्रकार सुध्दा आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात फक्त पाच संधीचा अभ्यास केला जाणार आहे.

"मुखंबीजसमुत्पत्तिर्नानार्थरससम्भवा।

अङ्गानि द्वादशैतस्य बीजारम्भसमन्वयात्।।

मुखसंधी, प्रतिमुखसंधी, गर्भसंधी, आवमर्शसंधी, निर्वहणसंधी या प्रमुख पाच संधी आहेत. या पाच संधी पटकथा लिहत असताना त्या कशा स्वरूपात येतात. चित्रपटाच्या अनुषंगाने उदाहरण देऊन अभ्यास करण्यात आलेला आहे.

१) **मुख संधी** - ही रसाची उत्पत्ती करणारी संधी आहे. जेव्हा एखाद्या नाटकांमध्ये विशिष्ट रस दिसत असेल तर ती उत्पन्न करणारी संधी म्हणजे मुख संधी आहे.

उदाहरणार्थ - १) 'स्त्री' या हिंदी चित्रपटांमध्ये जेव्हा नायकाला नाइकेबद्दल प्रेम व्यक्त होते, तेव्हा शृंगार रसाचे उत्पत्ती होते. जेव्हा गावातील लोकांना त्या स्त्रीबद्दल भीती वाटते तेव्हा भय या रसाची उत्पत्ती होताना दिसून येते. जिथे रसाची उत्पत्ती करणारी घटना असेल तिथे मुख संधी दिसून येते.

उदाहरणार्थ - २) मराठी मालिका माझ्या नवऱ्याची बायको यामध्ये राधिका हीला जेव्हा आपल्या पतीबद्दल कळतं की याचे लग्न बाह्य संबंध आहे. तेव्हा तिच्या मनामध्ये जी करूण रसाची उत्पती होते. किंवा जेव्हा तिला शनाया नावाच्या नायिकेबद्दल कळते तेव्हा तिच्याबद्दल द्वेष,मत्सर ही भावना निर्माण होत असताना सुद्धा एक विशिष्ट रस निर्माण होत असतो. असे म्हणता येईल, ज्या नाटकांमध्ये जेव्हा जेव्हा जो जो रस निर्माण होतो किंवा जो रस आपल्याला प्रतीत होतो. करूण रस, शृंगार रस, वीर रस, अद्भुत रस अशा ज्या काही रसाची आपल्याला उत्पत्ती दिसते त्या पटकथेच्या आधारावर किंवा त्या लिखाणाच्या आधारावर जेव्हा ती रसाची निर्मिती होत असते तेव्हा ती मुख संधीमुळे होते असे म्हणता येईल.

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 259-262

2) **प्रतिमुख संधी** - काही कथानकातील घटना दिसतात. काही घटना दिसत नाही. अशा घटनेला प्रतिमुख संधी म्हणतात. म्हणजे ज्या घटना आपल्याला दिसत नाहीत, परंतु त्या घडलेल्या असतात आणि मग जेव्हा ते नाटक किंवा ती पटकथा समोर जाते. तेव्हा ती घटना कालांतराने आपल्या समोर येते, तेव्हा त्या घटनेचा आणि आधीच्या घटनेचा जो काही संबंध असतो त्याला प्रतिमुख संधी असे म्हणतात.

काही भाग हा कालांतराने सिनेमा पुढे गेल्यानंतर आपल्याला लक्षात येते आणि काही भाग हा प्रदर्शित न करता प्रेक्षकांना तो लक्षात येतो की, ही घडलेली घटना आहे. आणि ती पुढे प्रेक्षकांना दिसते परंतु ती प्रदर्शित झालेली नसते.

उदाहरणार्थ - स्त्री या चित्रपटामध्ये जेव्हा स्त्री त्या गावातील एका बाईला घेऊन जाते तेव्हा घेऊन जाण्याची जी तिची पद्धत असेल किंवा घेऊन जाण्याचा जो भाग असेल तो प्रकाशित केलेला नाही. किंवा पटकथेमध्ये त्याचा उल्लेख असेलही पण तो दाखवताना दाखवला नाही. परंतु जेव्हा तिला शोधण्यासाठी जातात तेव्हा लक्षात येते की, इथे गावातील यातील असंख्य बाया तिथे बंदिस्ते केल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे जो भाग पटकथेमध्ये आलेला आहे. पण प्रदर्शित केलेला नाही पण तो कालांतराने प्रेक्षकांच्या समोर येतो. त्याला प्रतिमुख संधी असे म्हणतात.

३) **गर्भसंधी** - जेव्हा एखादे बीज दिसते आणि परत ते नष्ट होते त्याला परत परत शोधले जाते ती गर्भ संधी होय उदाहरणार्थ एखाद्या नाटकांमध्ये किंवा पटकथेमध्ये एखादी गोष्ट सातत्याने शोधल्या गेली जाते किंवा ती एखादी गोष्ट दिसते आणि परत लुप्त होते आणि तिला परत परत शोधले जाते तशा परिस्थितीला गर्भसंधी असे म्हणतात.

उदाहरणार्थ - स्त्री चित्रपट मध्ये स्त्री जेव्हा गावात येते तेव्हा ती लोकांना दिसते परंतु कालांतराने ती दिसत नाही. व लुप्त होते आणि मग त्याचा नायक तिला शोधण्यासाठी फिरत असतो. नायकाला ती जेव्हा भेटते तेव्हा तिचा ड्रेस शिवायला देते. नायक तो ड्रेस तयार ठेवतो पण स्त्री येत नाही. तो त्या स्त्रीची वाट बघत असतो. कुठेतरी दिसेल आणि तो शोध घेत असताना वेगवेगळ्या गोष्टी करत असतो आणि तिला शोधण्यासाठी अनेक प्रयत्न करतो. या घटनेला गर्भसंधी असे म्हणतात.

४) **अवमर्ष संधी** - जेव्हा राग व्यक्त करून, लोभ देऊन फलप्राप्ती केली जाते तसा विचार केला जातो त्याला अवमर्श संधी असे म्हणतात. उदाहरणार्थ एखादी गोष्ट प्राप्त करण्यासाठी जर कोणी प्रलोभन देत असेल किंवा दबाव आणत असेल आणि त्याचा निर्णय बदलण्याचा किंवा ते घटना बदलण्याचा प्रयत्न करत असेल तर तिथे अवमर्श संधी होते बऱ्यापैकी नायक आणि खलनायक जेव्हा एखादी घटना बदलण्याचा प्रयत्न करत असतात किंवा ती कथा बदलण्याचा प्रयत्न करत असतात तेव्हा अवर्मश संधी होते असे म्हणता येईल.

उदाहरणार्थ - स्त्री चित्रपट मध्ये त्या स्त्रीला परत बोलावून तीचा बदला घेण्यासाठी तीला प्रलोभने दिली जातात. ती विशिष्ट पूजेच्या दिवशी त्या गावांमध्ये येत असते. तर त्या पूजेचे आयोजन ती येण्याकरता केले जाते. स्त्री ला करिता नृत्य हा तिच्या आवडीचा भाग असतो आणि तिच्याच करिता नृत्याचा भाग प्रदर्शित केला गेलेला आहे. त्या नृत्याचे प्रलोभन तिला दिल्या गेलेले आहे. प्रलोभनानेच ती त्या गावांमध्ये त्या नृत्याच्या वेळी येते व त्या नृत्यांगनाला घेऊन जाते. प्रलोभन देऊन जेव्हा ती येते हा भाग अवमर्श संधीचा भाग आहे.

५) **निर्वहण संधी** - कथा वस्तूचा मुख्य विषय व इतर विषय इकडे तिकडे विखुरलेले असतात. इकडे तिकडे झालेले असतात. जेव्हा एका अर्थात एकत्र येतात. ती निर्वहण संधी होय. ही शेवटची संधी आहे जेव्हा नाटकांमध्ये वेगवेगळ्या घटना झालेल्या असतात आणि त्या घटना एकत्र आणण्यासाठी जेव्हा सगळ्या नाटकातील नायक खलनायक आणि वेगवेगळे पात्र हे एकत्र येतात, आणि ती घटना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतात. त्याला निर्वहण संधी असे म्हणतात.

उदाहरणार्थ -१)

स्त्री या चित्रपटामध्ये स्त्रीला संपवून पुढील मार्ग सुकर करण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्या नाटकातील शेवट सर्व पात्र एकत्र येतात. घटना एकत्र येतात. त्या घटनेला निर्वहन संधी म्हणतात.

उदाहरण -२)

'हम साथ साथ है' या हिंदी चित्रपटांमध्ये शेवटी सगळे पात्र एकत्र येतात.

**निष्कर्ष** - पटकथा आणि संधी यांचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, प्रत्येक पटकथेमध्ये एक विशिष्ट संधी आपल्याला दिसून येते. जी नाट्यशास्त्रामध्ये भरत मुनींनी आणि दशरुपकामध्ये धनंजय आणि वर्णित केलेली आहे.

**संदर्भ**

१) https://en.m.wikipedia.org/wiki/Screenwriting

२) https://en.m.wikipedia.org/wiki/Narrative_film

३) दशरुपक विधान - प्रा. र. प. कंगले महाराष्ट्र राज्य साहित्य - संस्कृती मंडळ मुंबई. प्र.आवृत्ती १९७४

४) डॉ. गो.के. भट - संस्कृत नाट्यसृष्टी

:::. Cite this article .:::

बुडईकर, प्राजक्ता आनंद. & सकळकळे, डॉ. जयश्री अ. (2024). दशरूपकातील संधी आणि पटकथा लेखन. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 259–262.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.52